॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड - ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT

Fax : (02462) 215572
Phone: (02462) 215246

website: srtmun.ac.in
E-mail: nss@srtmun.ac.in

जा.क्र. : रासेयो/२०२५-२६/३०१ दिनांक ~~२२~~ 24/०१/२०२६

## परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी,
रा.से.यो. राबविणारी सर्व संलग्नीत महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय:— प्रजासत्ताक दिना निमित्त सुजाण—सजग नागरिकत्व जागर अभियानांतर्गत भारतीय नागरिकत्वाची दिक्षा—प्रतिज्ञा देण्या बाबत.**

संदर्भ: मा. ज्ञानप्रकाश मोदाणी, महात्मागांधी सर्वोदय भवन, छत्रपती संभाजीनगर यांचे दि.०१/०१/२०२६ राजीचे निवेदन

महोदय,

उपरोक्त विषयी मा. ज्ञानप्रकाश मोदाणी, महात्मागांधी सर्वोदय भवन, छत्रपती संभाजीनगर यांनी समाजाचा, राष्ट्राचा सर्वांगीण, गतिमान विकास, नागरिकांची सुजाणता, सजगता, जागरूकता, राष्ट्रभक्ती, राष्ट्रीय चारित्र्य, शासकिय योजनेतील सक्रिय सहभाग, अभिक्रमशीलता, उद्योजकता, विविध कौशल्य आदीवर आवलंबून असतो. जागतिक स्तरावर सर्व क्षेत्रात स्पर्धा सुरू आहे. त्यात टिकून राहण्यासाठी नागरिकांची सुजाणता, सजगता, सक्रियता महत्वपुर्ण भूमिका निभावते. नागरिकांच्या सहभागातून राष्ट्राचा भौतिक, आर्थिक विकास गतिमान होईल. त्यासोबत मानवाचा, नागरिकाचा शारिरीक, मानसिक, सामाजिक, नैतिक, सांस्कृतिक, आध्यात्मिक विकास होणे आवश्यक आहे. भारतीय राज्यघटनेप्रमाणे देशातील युवक आपल्या वयाची १८ वर्षे पूर्ण केल्यानंतर नागरिक होतो. त्याची नागरिकत्व होण्याची प्रक्रिया ही गांभीर्याची, हक्काबरोबर कर्तव्याची जाण देणारी, भारतीय संविधानातील मूल्यांना बांधिल असण्याची, अंगीकारण्याची, संस्कार, धडा, जाणीव करून देणारी आहे. नागरिकत्व ही राष्ट्र जिवनात महत्वाची बाब असतांना त्यासाठी सामुदायिकरित्या संस्था स्तरावर कुठलाही विधी, कार्यक्रम, उपक्रम नाही. ही मोठी पोकळी व अतार्किक (illogical) बाब आहे. ही बाब गांभीर्याने घेऊन सुजाण—सजग नागरिकत्व जागर अभियान महात्मा गांधी सर्वोदय भवन, छत्रपती संभाजीनगर च्या वतीने प्रजासत्ताक दिनी राबविण्यात येतो. असे कळविण्यात अलेले आहे.

तरी त्या अनुषंगाने रा.से.यो. संलग्नीत सर्व महाविद्यालयांना तसेच रा.से.यो. पथक विद्यापीठ परिसर यांना सुचित करण्यात येते की आपल्या महाविद्यालयातील १८ वर्षे पूर्ण करणा—या युवकांना प्रजासत्ताक दिनानिमित्त सोमवार दिनांक २६ जानेवारी २०२६ रोजी आयोजित राष्ट्रध्वज वंदन कार्यक्रम प्रसंगी त्यांना प्रमुख अतिथी/प्रचार्याच्या वतीने सुजाण—सजग नागरिकत्वाची दीक्षा/प्रतिज्ञा देण्यात यावी व तसेच या प्रत्रासोबत प्रपत्रामध्ये नागरिकत्वाची प्रतिज्ञा दिलेली आहे. पात्र विद्यार्थ्यांनी अशा प्रपत्राच्या दोन प्रती परिपूर्ण भरून स्वाक्षरी करावी. एक प्रपत्र महाविद्यालयाच्या संग्रही व एक विद्यार्थ्याच्या संग्रही राहील. प्रतिज्ञा दिल्यानंतर भारतीय राज्यघटनेची प्रास्ताविका भेट देण्यात यावी, ही विनंती.

(टिप: सोबत नागरिकत्वाची प्रतिज्ञा व भारताचे संविधान उद्देशिकाची छायांकित प्रत पाठविण्यात येत आहे.)

डॉ. मारोती गायकवाड
संचालक
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

प्रत माहितीस्तव:
१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. प्र.कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा. कुलसचिव कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
४) मा.जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

प्रत माहिती तथा कार्यवाहिस्तव:
१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या व रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे, ही विनंती

Scanned with OKEN Scanner



# नवभारत निर्माण सजग नागरिकत्व जागर अभियान

## प्रजासत्ताक दिन, २६ जानेवारी

महात्मा गांधी सर्वोदय भवन, छत्रपती संभाजीनगर

महाविद्यालयाचे नांव : ______________________________

## भारतीय सजग नागरिकत्व जागर अभियान

विद्यार्थ्याचे संपूर्ण नाव: ______________________________ वर्ग :

पत्ता : ______________________________

मो. नं.: Email : ______________________________

जन्मदिनांक: १८ वर्षे पूर्ण झाल्याचा दिनांक :

## नागरिकत्वाची प्रतिज्ञा

मी, ______________________________ आजच्या प्रजासत्ताक दिनी राष्ट्रध्वज तिरंग्यास अभिवादन करीत असताना गंभीरपणे प्रतिज्ञा करतो / करते की, माझे वय १८ वर्षे पूर्ण झालेले आहे व मी भारताचा / भारताची नागरिक होण्यास पात्र झालेलो / झालेली आहे.

भारतीय राज्यघटनेतील मूल्ये समाजवाद, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय, विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य, दर्जा व संधीची समानता, व्यक्तीची प्रतिष्ठा, राष्ट्राची एकात्मता, बंधुता यांमध्ये माझी बांधिलकी राहील व त्याच्या संवर्धनासाठी व्यक्तिगत व सामूहिक प्रयत्न करीन भारतीय लोकशाही अधिक अर्थपूर्ण व प्रगल्भ व्हावी यासाठी मी नागरिक म्हणुन हक्का बरोबर कर्तव्याची जाण ठेवीन.

भारतीय स्वातंत्र्यसंग्राम व हैद्राबाद मुक्तिसंग्रामात हुतात्मा झालेले स्वातंत्र्य सैनिक यांचे त्याग, बलिदान याची सदादित आठवण ठेवील. त्यांच्या प्रती कृतज्ञभाव जोपासेल. नवभारत निर्माणात सजग सुजाण नागरिक म्हणून तत्परतेने सहभागी होत राहील. सामाजिक सद्भाव, सलोखा संवर्धनासाठी क्रियाशील राहील. राष्ट्रीय संपत्ती, ऐतिहासिक ठेवा यांचे जतन, संवर्धन करील पर्यावरण रक्षण व संवर्धनासाठी मी कार्यरत राहील शाश्वत संतुलित विकासासाठी आवश्यक निसर्गस्नेही जीवनशैली अंगीकारील.

खंडप्राय, विविधतेने नटलेला प्राचीन संस्कृती, अनेक धर्मांचे उगमस्थान, जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या भारतास विश्वमंचावर अहिंसा, सहअस्तित्व, सहकार्य, समन्वय व विश्वशांतीसाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावण्यासाठी ऐतिहासिक जबाबदारीचे भान मला आहे.

स्थान : दिनांक : स्वाक्षरी-

( नांव : ______________________________ )

टीप : नागरिकत्वासाठी पात्र विद्यार्थ्यांनी प्रपत्र दोन प्रतीत भरावे. एक प्रपत्र महाविद्यालयाच्या व एक स्वतःच्या संग्रहासाठी ठेवावे. स्वतःकडील संग्रहीत प्रपत्र अधूनमधून अवलोकन करीत जावे. या प्रतिज्ञेची आठवण ठेवून मनोनिर्धार कायम राहील असे पहावे.

Scanned with OKEN Scanner

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम**
**समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडवण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस :
सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय** ;
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य** ;
दर्जाची व संधीची **समानता** ;
निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून ;
**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित**
**करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

**महात्मा गांधी सर्वोदय भवन**
सिल्क मिल कॉलनी, पैठण रोड, छत्रपती संभाजीनगर- 431005. मो. 9404018282, 8530483751

Scanned with OKEN Scanner